# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2015-2017

YEAR : 40) 1st January 2015 (No. of Pages 08 ) ( No : 01


## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार, दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला ठराव

**एक :** दिनांक २४ ऑगष्ट २०१४ रोजीच्या ठरावान्वये सुरु करण्यात आलेले **आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

**दोन :** महाराष्ट्र शासनाशी चर्चा होऊन काही निर्णय शब्दबध्द करण्यात आल्याच्या परिणामी हा निर्णय घेण्यात आलेला नसून समोर असलेली परिस्थिती विचारात घेऊन महासंघाच्या कार्यकारी मंडळाने आपणहून निर्णय घेऊन ते आंदोलन मागे घेतले आहे, हेही स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे. जी **परिस्थिती विचारात घेऊन आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्या परिस्थितीबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेतः-**

(१) गेली दोन तीन वर्षे तत्कालीन शासनाने चर्चेची दारे पूर्णपणे बंद केलेली होती. त्यामुळे लहान लहानशा प्रश्नाबाबत शेकडो शिक्षकांना न्यायालयामध्ये डझनावारी याचिका दाखल कराव्या लागल्या. मा. उच्च न्यायालयात निर्णय झाल्यावरसुद्धा त्याप्रमाणे कारवाई न करता, सर्वोच्च न्यायालयात 'एसएलपी' दाखल करणे, ती 'डिसमिस' झाल्यावर पून्हा पूनर्विलोकन याचिका दाखल करणे, ती सुद्धा 'डिसमिस' झाल्यावर 'क्युरेटीव्ह पिटीशन' दाखल करणे, असे सरळसरळ वैरभावाचे धोरण तत्कालीन शासनाने स्वीकारले होते.

(२) परीक्षेशी सहकार्य करण्याचा निर्णय हा महासंघाने आता खुद्द न्यायालयातच जाहीर केल्यामुळे "शिक्षकांवरील कारणे दाखवा नोटीसेस मागे घेण्यात याव्यात" असा मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी आदेश दिल्यानंतर त्या नोटीसा मागे घेण्यात आल्या पण वेतन थांबवून ठेवण्याचे आदेश मात्र मागे घेण्यात आले नाही. तत्कालीन शासनाची ती एक वैरभावपूर्ण कृती होती.

(३) नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी झाल्यानंतर अनेक महिने पर्यंत व शेवटी तर आपल्या कारकिर्दीचा शेवट होईपर्यंत त्या आदेशाची अंमलबजावणी न करण्याचा तत्कालीन शासनाचा निर्णय शिक्षकांप्रती असलेला वैरभाववृत्तीचे अत्त्युच्च शिखर गाठणारा होता. या शिखरावर आरुढ होऊनच मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ३० ते ४० निर्णयांची अंमलबजावणी न करण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेतला होता.

(४) तत्कालीन शासनाच्या त्या वैरभाववृत्तींचा मुकाबला करण्यासाठी शिक्षकांना अनेक प्रकरणी अवमान याचिका दाखल कराव्या लागल्या व अनेक प्रकरणी क्षमायाचनापूर्वक सचिवांना शासननिर्णय निर्गमित करावे लागले. एकाबाजूला अवमान याचिकेच्या मार्गाचा अवलंब करीत असतांना शासनाची ती वैरवृत्ती उघडी पाडण्यासाठीच महासंघाला त्यावेळी आंदोलनाचा निर्णय जाहीर करावा लागला होता.

(५) विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी विभागाचा कारभार हाती घेतल्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०१४ रोजी अवघ्या काही दिवसाच्या आत रितसर पत्र देऊन महासंघाला चर्चेसाठी बोलविले. दिनांक १९ रोजी ही चर्चा पार पडली.

(६) दिनांक १९ नोव्हेंबर रोजीची ही चर्चा जवळजवळ दोन अडीच तास चालली. महासंघाचे निवेदन काळजीपूर्वक वाचून मा. उच्च शिक्षणमंत्री त्या बैठकीला आले होते. प्रत्येक मुद्यावर त्यांनी त्याची मते मोकळेपणाने मांडली. संघटनेची मते काळजीपूर्वक ऐकून घेतली. "आझाद मैदानावरील तुमच्या सभेमध्ये मी काय बोललो होतो याची ध्वनिफीत पाहूनच मी या बैठकीला आलो आहे" असेही त्यांनी अगदी सुरुवातीलाच सांगीतले.

(७) थांबवून ठेवलेले वेतन वितरीत करण्याबाबत व नेटसेट मुक्त शिक्षकांबाबत त्यांनी जे त्यांचे मत सभेत सांगीतले ते शब्दबद्ध झाले असते तर कदाचित आंदोलन समाप्तीचा निर्णय त्याच दिवशी घेण्यात आला असता. महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाची शासनाशी झालेली चर्चा शब्दबद्ध होऊन त्या चर्चेचे कार्यवृत्त तयार झाल्यावर असे कार्यवृत्त विचारात घेऊनच महासंघाच्या कार्यकारी मंडळामध्ये सुरु असलेले आंदोलन सुरु ठेवण्याचा किंवा थांबविण्याचा निर्णय घेतला जातो, अशी महासंघाची कार्यरिती असल्यामुळे व कोणतेही कार्यवृत्त न मिळाल्यामुळे त्या दिवशी कोणताच निर्णय होऊ शकला नाही.

(८) दिनांक १९ नोव्हेंबर रोजीच्या बैठकीनंतर कोणतीही चर्चा किंवा बैठक झालेली नाही किंवा होऊ शकली नाही. एक गोष्ट स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे ती अशी की विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी विभागाचा कारभार स्वीकारल्या पासून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांशी वैरभाव प्रदर्शित करणारा कोणताही निर्णय उच्च शिक्षण विभागातून निघालेला नाही.

(९) मा. उच्च न्यायालयाच्या किंवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्याच अंमलबजावणीचा प्रश्न प्रत्येक बाबतीत गुंतला असल्याने "निर्णय घेण्यासाठी थोडा वेळ दिला जावा" या मा. उच्चशिक्षणमंत्र्यांच्या मताचा आदर केला पाहिजे. असे या कार्यकारी मंडळाला वाटते.

(१०) मा. सर्वोच्च न्यायालयात व मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठासमोर दाखल असलेल्या अनेक प्रकरणामध्ये लक्ष देण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याची वेळ आता आलेली आहे हे सुद्धा लक्षात घेण्यात आले.

**तीन :** वर परिच्छेद दोन मध्ये नमूद केलेली स्थिती विचारात घेऊन उपरोक्त परिच्छेद एक मधील निर्णय घेण्यात आला आहे.

**(प्रा. ए. टी. सानप)** — *अध्यक्ष*
**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

## मा.उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अंमलबजावणी न केल्याबद्दल संचालक व सहसंचालक उच्चशिक्षण यांच्याकडून शासनाने खुलासे मागितले

*(महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या आदेशाचा परिछेद ४ पहा. पृष्ठ २ वर)*

# महाराष्ट्र शासन

***तात्काळ : क्र. न्यायप्र २०१४/प्र. क्र. ४७४/१४/वि. शि. -१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२***

## *दिनांक: ११ नोव्हेंबर, २०१४*

प्रति,

**(१)** संचालक, उच्च शिक्षण, पुणे. (२) प्र. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद/नांदेड/जळगांव विभाग.

**विषयः-** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद याचिका क्र. ३४४८/२०१४, क्र. ३५५२/२०१४, क्र. १७०४/२०१४ व क्र. ३९४/२०१४ क्र. १४३४/२०१४, क्र. ४१७३/२०१४ व क्र. ४३३/२०१४ बाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत.....

**संदर्भ:- (१)** संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/टे. क्र. ४/न्याक ८६१५, दि. १३.१०.२०१४. **(२)** विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांचे पत्र क्र. शिससं / उशि / औवि / अनुदान /२०१४ / ३८५९, दि. १०.१०.२०१४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन दिनांक १३/१०/२०१४ व दि. १०/१०/२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,

(i) याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद **यांनी बिगर नेट/सेट अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरुन CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असा निर्णय दि. ०१/०८/२०१३ च्या आदेशान्वये दिलेला आहे.**

(ii) सदर आदेशाविरुद्ध शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ दाखल केली असून सदर SLP मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.०४/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये नेट/सेट मधून सूट दिलेली आहे. या दिनांकास **ज्या अध्यापकांची सेवा ६ वर्षे पूर्ण झालेली आहे, त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे दि. १८.११.२०१३ रोजी अंतरिम आदेश दिलेले आहेत.**

(iii) याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी **बिगर नेट/सेट अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरुन CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असा निर्णय दि. १/०८/१३ च्या आदेशान्वये दिलेला आहे.**

(iv) मा. उच्च न्यायालयाचे उक्त दि.११ एप्रिल, दि.०६ मे व दि.०७ मे, २०१४ चे आदेश हे मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.३४११८/२०१३ मध्ये दि.१८/११/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार आहेत.

(v) **मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.१८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत.** तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि.११ एप्रिल, दि.०६ मे व दि.०७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही.

(vi) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहीत मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**

**२.** वर नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता उक्त याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार याचिकाकर्त्यांना विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत.**

**३.** विषयांकीत याचिका क्र. ३४४८/२०१४, क्र. ३५५२/२०१४, क्र. १७०४/२०१४ व क्र. ३९४/२०१४ या ४ याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., औरंगाबाद विभाग, क्र.१५३४/२०१४ व क्र.४१७३/२०१४ या २ याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., नांदेड विभाग, नांदेड व याचिका क्र.४३३/२०१४ ही याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., जळगांव विभाग, जळगांव यांचेशी संबंधित आहे.

**४. प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहनिबंधक, उ.शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**

तसेच उक्त याचिका क्र.१५३४/२०१४ व क्र.४१७३/२०१४ बाबत विभागीय सहसंचालक, उ.शि., नांदेड विभाग, नांदेड व याचिका क्र.४३३/२०१४ बाबत विभागीय सहसंचालक, उ.शि., जळगांव यांनी कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती शासनास तात्काळ सादर करावी.

आपला

(विकास तु. कदम)

** AF : P11 ** **कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

*टिप:- 'सहसंचालक' या शब्दाऐवजी 'सहनिबंधक' हा शब्द चुकून वापरला असावा असे वाटते. - संपादक*

IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY
BENCH AT AURANGABAD
**WRIT PETITION NO. 1534 OF 2014**

BHUMREDDY VITHALREDDY PULLAGOR AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS
**WRIT PETITION NO. 1704 OF 2014**
PRAMILA UDHAVRAO BHAGAT AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS
**WRIT PETITION NO. 4173 OF 2014**
DR. DILIP SAMBHAJIRAO PALIMKAR AND ANOTHER **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS
**WRIT PETITION NO. 394 OF 2014**
DR. BALIRAM VISHWANATH RAKH AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS
**WRIT PETITION NO. 433 OF 2014**
VASUDEO SOMAJI PATEL AND OTHERS **VERSUS** UNIVERSITY GRANTS COMMISSION AND OTHERS

Advocate for Petitioners : Mr. Pradeep Deshmukh h/f Mr.H.A.Joshi
AGP for Respondents: Mrs. V.A.Shinde

**CORAM : S.S. SHINDE & V.K. JADHAV, JJ.**
**Dated: May 07, 2014**

**PER COURT :-**

1. Heard learned counsel appearing for the petitioner. He submits that, facts involved in this petition are similar like in Writ Petition No.9470/2013. Learned counsel for the petitioner submits that all petitioners are appointed and exemption granted to them by U.G.C. In the light of submissions of counsel for the petitioner and this Court in similar petitions passed the order. We are inclined to pass the following order :-

**ORDER**

"1. Rule.

2.Learned AGP waives service of Rule for Respondent State and State authorities.

3.In view of the notifications dated 21.2.2008 and 23.2.2008 respectively, issued by the University Grants Commission,petitioner, who has not passed NET/SET examination but who has completed six years of service as on the date, should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

**4. The respondents shall release monetary benefits accruable to the petitioner in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of TWELVE WEEKS from today.**

5. The above interim order shall be subject to final outcome of the writ petition as well as decision of the Supreme Court in Special Leave Petition (Civil) No.34118/2013, dated 18.11.2013."

2. In case statement made by the counsel for the petitioner is not in consonance with the factual assertion, liberty to the counsel for the respondent No.7 to get this matter moved for urgent orders.

**प्रा. बी. टी. देशमुख**
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*
**क्र. ३, सुबोध कॉलनी विदर्भ महाविद्यालय रोड,**
**अमरावती ४४४६०४**
14.11.2014

**विषय :** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध प्रश्नावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा होणेबाबत.

प्रति,
**मा. मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई**

मा. महोदय,

अनेक विषयांच्या बाबतीत शासनस्तरावर निर्णय घेण्यासाठी कुणी तयारच नसल्यामुळे गेल्या २-३ वर्षात डझनावरी विषयांच्या बाबतीत अनेक डझन याचिका मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या असून शेकडो शिक्षक त्यामध्ये याचिकाकर्ते आहेत. त्यापैकी ३० ते ४० प्रकरणामध्ये मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय होऊन अनेक महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी शासनाच्या पातळीवर काहीच कारवाई होत नसल्याने उच्च शिक्षण क्षेत्रात कमालीच्या असंतोषाचे वातावरण आहे. **येथे हेही नमूद केले पाहिजे की एका मागून एक अवमान याचिका दाखल झाल्यामुळे गेल्या काही दिवसात दोन तीन शासननिर्णय निर्गमित झालेले आहेत.**

२. आज उच्च शिक्षण विभागामध्ये जसा नेट-सेट चा घोळ घालण्यात आलेला आहे. तसाच १९७५-७७ या काळात 'एम.फील' चा घोळ घालण्यात आला होता. पात्रतेच्या अटी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाहीत असे असतांना व ४ एप्रिल १९७५ रोजी "सेवेत असलेल्या लोकांना ती अट लागू राहणार नाही" असे शासनाने विधानसभेत घोषित केले असतांना व मुळ केंद्राच्या योजनेत तसे नसतांना पुढे मात्र आणिबाणीचा फायदा घेऊन प्रत्यक्ष शासननिर्णय काढला तेव्हा "सेवेत असलेल्या व नंतर येणाऱ्या सर्वांनाच ही अट लागू राहील" असा आदेश निघाला. त्यामुळे त्यावेळी उच्च शिक्षण क्षेत्रात तीव्र संतापाची लाट उसळली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याला तीव्र विरोध केला. तेव्हा शासनाने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना आणिबाणीमध्ये मिसाखाली अटक करून १५ महिने स्थानबद्धतेमध्ये ठेवण्यात आले. मात्र महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने त्या शासन निर्णयाला विरोध चालूच ठेवला. आणिबाणीच्या त्या काळामध्ये दडपशाहीचे धोरण स्वीकारल्यामुळे चर्चाच बंद झाली. 'एम.फील' या एका पात्रतेच्या विषयाबाबतच नव्हे तर अनेक विषयाबाबत अन्यायकारक कृत्यांचा सपाटाच लावण्यात आला. "Will is the basis of the State, not force" या थॉमस हिल ग्रीनच्या सिद्धांन्ताचा विसर पडलेल्या राज्यकर्त्यांना पायउतार व्हावे लागले. नव्याने मुख्यमंत्री म्हणून आलेल्या मा. वसंतराव दादा पाटील यांना जेव्हा आम्ही या बाबी सांगीतल्या तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. **मा. मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी तीन वेगवेगळ्या दिवशी चर्चांचे आयोजन केले. प्रत्येक दिवशीची बैठक अनेक तास चाललेली होती.** प्रत्येक प्रश्नावर शासनाच्या वतीने त्यांनी निर्णय घेतले व मतैक्यपत्राचा दस्तऐवज संघटनेच्या सुपूर्त केला. "Consensus Reached in the Discussions of the Representatives Of the Maharashtra Federation of University And College Teachers Organisations With the Chief Minister of Maharashtra" असा या दस्तऐवजाचा मथळा असून त्यापैकी **पहिले मतैक्यपत्र** दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी उभयपक्षी स्वाक्षरित करण्यात आले, **दुसरे मतैक्यपत्र** दिनांक १५ जूलै १९७७ रोजी व **तिसरे मतैक्यपत्र** दिनांक २२ ऑगस्ट १९७७ रोजी उभयपक्षी स्वाक्षरित करण्यात आले. **महासंघाच्या स्थापनेपासून मी महासंघाच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य असल्यामुळे या सर्व घटनांचा मी प्रत्यक्षदर्शी आहे.** पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी व नोकरशाहीने गोंधळ घालून ठेवलेल्या निरनिराळ्या १० ते १२ प्रश्नावर शासनाचे निर्णय नोंदविण्यात आलेले असून ती तीनही मतैक्यपत्रे शासनाच्या वतीने तत्कालीन शिक्षणसचिव श्री. द. म. सुकथनकर यांनी स्वाक्षरित केलेली असून संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष व सरकार्यवाह यांनी स्वाक्षरीत केलेली आहे. **या तीनही मतैक्य पत्राच्या प्रति मुद्दाम आपल्या अवलोकनासाठी** (सहपत्र एक, दोन व तीन म्हणून) मी सोबत जोडलेल्या आहेत.

३. पुढे वीस एक वर्षाच्या कालखंडानंतर नोकरशाहीच्या लहरीमुळे अनेक प्रश्न निर्माण झालेत. उच्चशिक्षण क्षेत्रामध्ये खुपच तीव्र असंतोष निर्माण झाला. जवळजवळ ५२ दिवस आंदोलन चालले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरदराव पवार यांनी दिनांक २८ डिसेंबर १९८८, त्यानंतर ११ जानेवारी, १३ जानेवारी, १४ जानेवारी, १७ आणि १८ जानेवारी १९८९ अशा ६ दिवशी सह्याद्री अतिथीगृहावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघांशी चर्चा केली. **प्रत्येक दिवशीची चर्चा अनेक तास चालली. चर्चेच्या शेवटी उभयपक्षी एक सहमती पत्र** "AGREEMENT REACHED IN THE DISCUSSIONS OF THE REPRESENTATIVES OF THE MAHARASHTRA

---

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**11 TH NOVEMBER 2014**

**Shri Vinodji Tawade**
Hon'able Minister of Eduction,
Government of Maharashtra, Mantralay, Mumbai.

I like to draw your attention that MFUCTO in the Executive Committee meeting held on Sunday 2 nd November 2014 at Mumbai passed a resolution which was in continaution with earlier resolution, passed at Pune 24 th August 2014. A copy of the resolution is enclosed along with this letter. A list of issues enclosed, highlighting the issues to be disscused with you at the time of meeting.

I also want to apprise you that all the affiliate units of MFUCTO publish their bulletin/circular highlighting the above decision of Executive committee. A copy of the NUTA Bulletin published by one of our unit, contain the resolutions as mentioned above is also enclosed.

We earnestly request you to give an early appointment to the Executive committee of MFUCTO to discuss all the burning issues as mentioned in the resolution referred to above. We shall appreciate if you grant us an appointment before the commencement of our next round of agitation 24 th November 2014 as per our resolution mentioned above. A list of the members of the Executive Committee is also enclosed for the convenience to convey the meeting.

Thanking you with regards,

Prof. A. T. Sanap (President)
Prof. Tapati Mukhopadhyay (General Secretary)
MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

** FS : P01 **

---

जा.क्र.मंत्री,शा.शि.क्री.,उ.व.तं.शि.,वै.शि.,म.भा.,सां.का.

**टिप्पणी क्र./१३/,दिनांक:१७/११/२०१४**

*मंत्री*

शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

**दिनांक : १७/११/२०१४**

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघ एम-फुक्टो/शिक्षण मंच/मुक्ता यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मा. मंत्री महोदय (शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य ) हे सदर संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत. त्या अनुषंगाने संबंधित संघटनेच्या प्रतिनिधींसमवेत बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी दुपारी १२.०० ते ०१.४५ या वेळेत मा. मंत्री महोदयांचे समिती कक्ष, मंत्रालय (विस्तार), मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस आपल्या संघटनेचे प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याबाबत मा. मंत्री महोदयांच्या निदेशानुसार विनंती आहे.

(विद्याधर महाले)
खाजगी सचिव.

प्रति,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघ एम-फुक्टो/शिक्षण मंच/मुक्ता
प्रत माहितीस्तव- १. मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.

** AF : P01 **

FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) WITH THE CHIEF MINISTER OF MAHARASHTRA." १८ जानेवारी १९८९ रोजी स्वाक्षरीत करण्यात आले. शासनाच्या वतीने तत्कालीन शिक्षणसचिव श्रीमती कुमूद बंसल यांनी व महासंघाच्यावतीने अध्यक्ष व सरकार्यवाह यांनी ते स्वाक्षरित केलेले आहे. मी सदरहू सहमतीपत्राची प्रत सत्वर संदर्भासाठी **सहपत्र चार** म्हणून सोबत जोडलेली आहे.

४. त्यामानाने सन १९९९ मध्ये फक्त एकच विषय वादग्रस्त असल्यामुळे तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटीस यांनी दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले व चर्चा करून प्रश्न निकाली काढला. चर्चेचे कार्यवृत्त "Discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisation (MFUCTO) with the Hon. Minister for Higher & Technical Education on behalf of the Government held on 7.12.99 at 4.00p.m." त्याच बैठकीत तयार करून उभयपक्षी स्वाक्षरीत करण्यात आले व त्यामुळे त्यावेळेला कोणतेही आंदोलन झाले नाही. या कार्यवृत्ताची प्रत मी मुद्दाम सत्वर संदर्भासाठी **सहपत्र पाच** म्हणून या पत्रासोबत जोडलेली आहे.

**५. गेली दोन तीन वर्षे एकूणच उच्च शिक्षणक्षेत्रात अराजकाने धुमाकूळ घातला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ३०-४० न्यायनिर्णयांची अनेक महिने अंमलबजावणी होत नाही याला अराजकाशिवाय दुसरे नाव देता येत नाही.** अवमान याचिका दाखल झाल्यावर मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयात उच्चशिक्षण सचिव बिनशर्त क्षमायाचना करतात व तेवढ्यापुरता एखादा दुसरा शासननिर्णय निर्गमित होतो. आपल्या अधिवक्त्यामार्फत मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयात हा संघर्ष करीत असतांना अनेक न्यायनिर्णयांची अंमलबजावणी न होण्याच्या या घटनाबाह्य कृत्याच्या विरोधात हे शिक्षक गेल्या पाच सहा महिन्यांपासून बाहेर महासंघाच्या नेतृत्वाखाली आंदोलन करीत आहेत. महासंघाचे याबाबतचे ठराव मी सोबत आपल्या माहितीसाठी जोडलेले आहेत. **मुद्दाम आपणास पत्र लिहिण्याचे कारण असे की महासंघाच्या कार्यकारी मंडळाला आपण चर्चेची संधी द्यावी व हे प्रश्न समजून घ्यावेत अशी विनंती आहे. विशेष लक्षात घेण्याची बाब म्हणजे यावेळचे सर्वच्या सर्व विषय मा. उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयांच्या अंमलबजावणीशी संबधित आहेत.** शिवाय मुख्य अराजक उच्चशिक्षण विभागात असले तरी यामध्ये एकापेक्षा जास्त विभागाचा संबंध येत असल्यामुळे बैठक आपल्या स्तरावरच होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**"केंद्रशासनाकडील महाराष्ट्र राज्याचे पंधराशे कोटी रूपये बुडाले तरी चालतील पण या शिक्षकांची थकबाकी आम्ही देणारच नाही, असा क्रुर व असामान्य विचार ज्या राज्यकर्त्यांनी केला त्यांनी राज्याचे कोणते 'आर्थिक हित' डोळ्यासमोर ठेवले होते? हे सामान्य बुद्धीला समजण्यापलीकडचे आहे."** ही जी वस्तुस्थिती महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपल्या २ नोव्हेंबर २०१४ च्या ठरावान्वये शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे त्यांची गंभीर नोंद शासनस्तरावर घेतली पाहिजे असे मला वाटते.

आपला विनित
प्रा. बी. टी. देशमुख

**सहपत्रे :** पृष्ठ ३ वर दिलेल्या सहपत्रामध्ये समाविष्ट असलेल्या कागदपत्रांच्या अनुक्रमणिकेत समाविष्ट असलेली सर्व सहपत्रे.

**पत्राची प्रतिलिपी** : (१) **श्री. विनोदजी तावडे मा. शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य,** यांना समादराने अग्रेषित. एकापेक्षा जास्त विभागाचा संबंध येत असल्यामुळे मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केलेले असले तरी बहुतेक विषय हे उच्चशिक्षण खात्याअंतर्गत असल्याने त्यांनी तातडीने महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा घडवून आणावी अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

(२) **श्री. नितिनजी गडकरी मा. भूपृष्ठ परिवहन मंत्री, भारत सरकार,** यांना समादराने अग्रेषित. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्ट मंडळाने २० जून २०१४ रोजी आपली दिल्ली मुक्कामी भेट घेऊन याबाबतची वस्तुस्थिती आपणास विदीत केली. त्याच दिवशी मा. गृहमंत्री भारत सरकार यांनाही महासंघाने याबाबतचे निवेदन दिले होते. **"या शिक्षकांना तुम्ही Career Advancement Scheme नाकारू शकत नाही. व्याजासकट त्यांना थकबाकी अदा करा" हा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय** होऊन १५ महिने झालेत. **"वेतनश्रेणीच्या प्रयोजनार्थ यांना Career Advancement Scheme चे लाभ देण्यात यावेत" असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय** होऊन १२ महिने झालेत. ही थकबाकी अदा न केल्यामुळे पंधराशे कोटी रूपयाचा महाराष्ट्राचा निधी केंद्र स्तरावर अडकून पडलेला आहे. हे पंधराशे काटी रूपये महाराष्ट्राला तातडीने मिळतील

## Nagpur University Teachers' Association
### MEETING NOTICE : 1
**DATED : 01.01.2015**

From :
**Dr. A.W.DHAGE**
Secretary, NUTA Sankalp Sahaniwas,
Khare Town, Dharampeth,
Nagpur-444 010
To,
All the members of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.A.W.DHAGE,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting***
***12.00 Noon on Sunday, the***
***15 th March, 2015***

## सन २००६ पूर्वी पी.एचडी. प्राप्त सेवाज्येष्ठ शिक्षकांना सेवाकनिष्ठ शिक्षकांपेक्षा कमी वेतन मिळणे : २

(१) सन २००६ पूर्वी ज्या शिक्षकांनी पी.एचडी. प्राप्त केली त्यांना त्यावेळच्या शासननिर्णयानुसार उत्तेजनार्थ वेतनवाढी दिल्या गेल्या. सन २००६ नंतर ज्या शिक्षकांनी पी.एचडी. पदवी प्राप्त केली त्यांना देण्यात आलेल्या उत्तेजनार्थ वेतनवाढीमुळे एकाच महाविद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षकांना त्याच महाविद्यालयातील सेवेत कनिष्ठ असलेल्या शिक्षकांपेक्षा कमी वेतन मिळण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडून आले. दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक १०२८३ मध्ये दिलेला निर्णय सन २०१४ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ १७ ते २० वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

(२) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त निर्णयाच्या संदर्भात पुढे करावयाच्या कारवाईबाबत विचार करण्यासाठी सन २००६ पूर्वी पी.एचडी. मिळालेल्या सेवाज्येष्ठ शिक्षकांना त्याच महाविद्यालयातील २००६ नंतर पी.एचडी. मिळालेल्या सेवेत कनिष्ठ शिक्षकांपेक्षा वेतन कमी मिळत असेल अशा नागपूर व अमरावती विभागातील सेवाज्येष्ठ प्राध्यापकांच्या सभेचे आयोजन शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती येथे रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात आले होते.

(३) त्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे मा. उच्च न्यायालयापुढे एकूण ५६ शिक्षकांच्या २० याचिका दाखल करण्यात आल्या. तांत्रिक कारणामुळे महाविद्यालय निहाय याचिका वेगवेगळ्या दाखल कराव्या लागल्या. त्यापैकी सन २०१४ च्या याचिका क्रमांक ३८८५ मध्ये दिनांक १६ डिसेंबर २०१४ रोजी एक निकाल शिक्षकांच्या बाजूने लागला असून तो याच अंकात पृष्ठ ७ वर प्रकाशित करण्यात आला आहे.

**- डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा'**

*PR :- (1) P16 NB14*

यासाठी उभय शासनाच्या स्तरावरील कारवाई तातडीने पूर्ण होण्यासाठी व सर्वच न्यायालयीन निर्णयांचा महाराष्ट्र शासनस्तरावर आदर केला जावा यासाठी आपण यथोचित प्रयत्न करावा ही विनंती.

## सहपत्रामध्ये समाविष्ट असलेल्या कागदपत्रांची अनुक्रमणिका

(1) दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या ठरावान्वये सुरू करण्यात आलेले आंदोलन ठामपणे सुरू राहील महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला ठराव क्रमांक : एक (Not printed here, since circulated hereinbefore, on page 189 of 2014 NUTA Bulletin)

(2) **CONSENSUS NO.1 : 23.4.1977** : Consensus Reached in the Discussions of the Representatives Of the Maharashtra Federation of University And College Teachers Organisations With the Chief Minister of Maharashtra (Not printed here, since circulated hereinbefore, on page 541 of 2001 NUTA Bulletin)

(3) **CONSENSUS NO.2 : SIGNED ON 15.7.1977 :** Consensus reached in the discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations with the Chief Minister of Maharashtra on 4th June 1977, and subsequent meeting held on 8th July 1977 (Not printed here, since circulated hereinbefore, on page 542 of 2001 NUTA Bulletin)

(4) **CONSENSUS NO.3 : 22.8.1977** : Consensus reached in the discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers Organisations with the Chief Minister on 4th June 1977 and subsequent discussions held ending with 22nd August 1977 (Not printed here, since circulated hereinbefore, on page 543 of 2001 NUTA Bulletin)

(5) AGREEMENT REACHED IN THE DISCUSSIONS OF THE REPRESENTATIVES OF THE MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) WITH THE CHIEF MINISTER OF MAHARASHTRA, on 18.01.1989 (Not printed here, since circulated hereinbefore, on page 567 of 2001 NUTA Bulletin)

(6) Discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisation (MFUCTO) with the Hon. Minister for Higher & Technical Education on behalf of the Government were held on 7.12.99 at 4.00p.m. (Not printed here, since circulated hereinbefore, on page 568 of 2001 NUTA Bulletin)

(7) घटनाबाह्यरितीने कारभार चालवित असल्याने राज्यशासनाच्या बरखास्तीची मागणी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक १ जून २०१४ रोजीच्या बैठकीत संमत केलेला ठराव (Not printed here, since circulated hereinbefore, on page 117 of 2014 NUTA Bulletin)

(8) उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी तरी आहेत किंवा उच्च शिक्षण विभागावरील त्यांचे नियंत्रण पूर्णपणे सुटले तरी आहे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या पुणे येथील बैठकीत संमत केलेला ठराव (Not printed here, since circulated hereinbefore, on page 153 of 2014 NUTA Bulletin)

***महाराष्ट्र शासन***

*सहसंचालक (उच्च शिक्षण)*

*१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे- ४११ ००१*

Website: www.jdhepune.info Email-admin@jdhepune.info

दूरध्वनी क्रमांक - ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/प्राध्यापकांचे सामुहीक रजा आंदोलन/ २०१४/५६५३ दिनांक ६.१२.२०१४

*अतितातडीचे/महत्त्वाचे*

प्रति,

(१) कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.(२) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.(३) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक(४) कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे-६(५) कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.(६) प्राचार्य / प्राचार्या,(७) सर्व अशासकीय कला, वाणिज्य,विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,पुणे अहमदनगर व नाशिक जिल्हे.

**विषय- वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांचे सामुहिक रजा आंदोलनाबाबत..**

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, विद्यापीठातील / अशासकीय महाविद्यालयातील प्राध्यापक दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी सामुहिक रजेवर जाणार असल्याचे कळते. **तरी कुलसचिव / प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपण कोणत्याही परिस्थितीत प्राध्यापकांना आंदोलनासाठी रजा मंजूर करु नये व सदर दिवशी विद्यापीठे / महाविद्यालये सुरळीत चालू राहतील तसेच अध्यापनाचे कामही सुरळीतपणे चालू राहील याची कुलसचिव / प्राचार्यांनी दक्षता घ्यावी** व याबाबतचा सविस्तर अहवाल सोमवार, दिनांक ८.१२.२०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत याकार्यालयाच्या admin@jdhepune@info या ई-मेलवर विनाविलंब पाठविण्यात यावा.

(डॉ.एस.एस.शेटे)

सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे १

** AF : P03 **

IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY
BENCH AT AURANGABAD

**WRIT PETITION NO. 3448 OF 2014**

SUNIL RAOSAHEB RAUT **VERSUS**
THE UNION OF INDIA AND OTHERS

Advocate for Petitioner : Mr. S.B. Talekar
AGP for Respondents: Mr. G.K.Naik Thigle

...

CORAM :
S.S. SHINDE & V.K. JADHAV, JJ.

**Dated: April 11, 2014**

PER COURT:

Liberty to add the Management as party Respondent.

2.Perused the order passed by the Supreme Court in Special Leave to Appeal (Civil) No.34118 of 2013, dated 18.11.2013.

3. Rule.

4.Learned Counsel for respective Respondents waive service of Rule.

5. In view of the notifications dated 2.6.2009, 22.3.2010,23.3.2010, 26.3.2010 and 26.8.2011, respectively, issued by the University Grants Commission, petitioners, who have not passed NET/SET examination but who have completed six yearsofservice as on the date, should be entitled to be benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

6.The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today.

7.The above interim order shall be subject to final outcome of the writ petitions as well as decision of the Supreme Court in above referred Special Leave Petition.

8.Liberty to respondents to apply for modification of the order, if deemed necessary.

( V.K. JADHAV, J. ) ( S.S. SHINDE, J. )

## *नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मुद्देनिहाय चर्चा होतांना चर्चा सुकर व्हावी म्हणून मुद्यांची पूर्वसूचना*

दिनांक १९ नोव्हेंबर २०१४ रोजी मा.उच्च शिक्षणमंत्री यांचे सोबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाची वेगवेगळ्या प्रश्नावर जी चर्चा झाली,त्या चर्चेच्या वेळी "नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबत प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीने आज सर्वसाधारण चर्चा होईल.नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मुद्दे निहाय चर्चा पुढील बैठकीत करू" असे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगीतले.

नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत पुढच्या बैठकीत मुद्देनिहाय चर्चा करणे सुकर व्हावे या हेतूने १९ नोव्हेंबर २०१४ च्या बैठकीत मी उपस्थित केलेल्या किंवा करणे अपेक्षित असलेल्या मुद्यांची पूर्वसूचना देत आहे.पुढील बैठकीच्या वेळी मुद्देनिहाय माहीती विभागाने तयार ठेवण्याविषयी विभागाला सूचना व्हाव्यात अशी मा.मंत्री महोदयांना विनंती आहे.

विनित

२६.११.२०१४ **प्रा. बी. टी. देशमुख**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष

प्रति

**मा. विनोदजी तावडे**

उच्च शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य

**सहसंचालक उच्चशिक्षण अमरावती विभाग, अमरावती**

जावक क्र. ससं/उशि/अनु-४/५६००/२०१४

**दिनांक १२/१२/२०१४ : तात्काळ**

प्रति,
सर्व प्राचार्य
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षण
उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**विषय** :- बहिष्कारात सहभागी प्राध्यापकांची माहीती खालील तक्त्यात भरुन उलट टपाली या कार्यालयास सादर करणे बाबत.

**संदर्भ** :- मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, यांचा दिनांक ११/१२/२०१४ चा दूरध्वनी संदेश.

वरील सर्व प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात संपात सहभागी असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची माहीती खालील तक्त्यात भरुन आजच ई-मेल द्वारे MS-Excel मध्ये DVB TT Surekh या फॉन्ट मध्ये भरुन सादर करावी. सदर माहिती अतिसंवेदनशिल असल्यामुळे प्रथम प्राधान्य देवून माहीती सादर करावी.

### *संपकालीन वेतन अदायगीबाबतचा तपशिल*

(१) अ.क्र. (२) महाविद्यालयाचे नाव (३) एकूण कार्यरत अध्यापकांची संख्या (४) फेब्रुवारी पेड ईन मार्च २०१३ चे अध्यापकांचे एकूण वेतन (A) एकूण देय वेतन (B) अदा केलेले वेतन (५) संपात सहभागी असलेल्या अध्यापकांची संख्या (६) मार्च पेड ईन एप्रिल २०१३ चे अध्यापकांचे एकूण वेतन (A) एकूण देय वेतन (B) अदा केलेले वेतन (७) एप्रिल २०१३ मध्ये संपात सहभागी असलेल्या अध्यापकांची संख्या (८) एप्रिल पेड ईन मे २०१३ चे अध्यापकांचे एकूण वेतन (A) एकूण देय वेतन (B) अदा केलेले वेतन (९) मे २०१३ संपात सहभागी असलेल्या अध्यापकांची संख्या (१०) मे पेड ईन जून २०१३ चे अध्यापकांचे एकूण वेतन (A) एकूण देय वेतन (B) अदा केलेले वेतन

स्वाक्षरी

प्राचार्य...........

(मुळ पत्रात क्रमांक १ ते १० वरील माहीती तक्ता स्वरुपात मागितली आहे.)

*** AF : P 05 ***

## *नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत विचारात घ्यावयाचे मुद्दे*

**(१)** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून भरती होण्यासाठी काय "शैक्षणिक पात्रता" असावी? ती ठरविण्याचा अधिकार कायद्याने कुणाला देण्यात आला आहे?

**(२)** शासननिर्णय काढून अशी पात्रता ठरविण्याचा शासनाला अधिकार नसतांना २३ ऑक्टोबर १९९२ ला एक शासननिर्णय काढून नेट-सेट ची पात्रता सक्तीची करण्याचा प्रयत्न झाला होता हे खरे काय?

**(३)** "शासन आपल्याकडे शासननिर्णयाने पात्रता ठरविण्याचे हे अधिकार घेऊ पाहत आहे" हा समज दूर करण्यासाठी २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय २७ नोव्हेंबर १९९२ च्या शासननिर्णयाने रद्द करण्यात आला होता हे खरे आहे काय?

**(४)** महाराष्ट्र राज्यामध्ये नेट-सेट ही पात्रता १९९९ च्या शेवटापर्यंत सक्तीची म्हणून लागू करण्यात आली नव्हती. "**सरकारकडून त्यावेळी ही चुक झाली**" असे तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी विधानपरिषद सभागृहात सांगीतले होते हे खरे आहे काय?

**(५)** "**सन १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट-सेट बाबतच्या रेग्युलेशनची महाराष्ट्र शासनाने अंमलबजावणी केली नव्हती**" असे शपथपत्र विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. औरंगाबाद उच्च न्यायालयासमोर सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ या प्रकरणात सादर केले हे खरे आहे काय?

**(६)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रतिपादन वस्तुस्थिती दर्शक असल्याने शासनाला त्यास विरोध करता आला नाही व त्यामुळे "**सन १९९१ च्या नेट-सेट संदर्भातील रेग्युलेशनची महाराष्ट्र शासनाने अंमलबजावणी केली नव्हती असे दिसून येते.**" असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने १७ ऑक्टोबर २०१३ रोजी उक्त प्रकरणी निर्णय देतांना काढला हे खरे आहे काय?

**(७)** नेट-सेट बाबतच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनची तपशिलवार चिकित्सा करणारा व त्याचे स्वरूप स्पष्ट करणारा, या संदर्भात अंतिम शब्द मानल्या गेलेला एक निर्णय (AIR 1995 SUPREME COURT 336) मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९९४ मध्ये दिला असून त्यानुसार हे रेग्युलेशन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही असा निर्णय दिला हे खरे आहे काय?

**(८)** महाराष्ट्र विधानपरिषदेत मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी "**नेटसेट परीक्षेच्या स्वरुपाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतिम निर्वाळा**" या विषयावरील तारांकीत प्रश्न क्रमांक १९५२१उत्तर देतांना "(१) नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व **विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील** (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;" या प्रश्न भाग १ ला तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री **मा. श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी ठामपणे "होय" असे लेखी उत्तर दिले आहे हे खरे आहे काय?**

**(९)** सन १९९१ चे नेट-सेट बाबतचे रेग्युलेशन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही. या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळेच ती बाब शासननिर्णय

8 TH DECEMBER 2014
AT 3.09 PM
SHRI VINOD TAWADE HAS TWEETED

" One day CL of college teachers for their demands. I am positive for them would appeal them to give us some time for, We hardly have completed a month ! "

(२७ जून २०१३) काढून महाराष्ट्र शासनाने मान्य केली व **१९९१ पासून हे रेग्यूलेशन सक्तीचे होते हा आपला आग्रह महाराष्ट्र शासनाने सोडून दिला** व आम्ही २३ ऑक्टोबर १९९२ रोजी शासननिर्णय काढल्यामुळे त्या तारखेपासून सक्तीचे समजले जाईल असा शासननिर्णय काढला हे खरे आहे काय?

**(१०) २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय लगोलग पुढच्याच महिन्यात रद्द करण्यात आला होता.** ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने एका ठरावान्वये अथवा अन्य कुणीतरी शासनाच्या लक्षात आणून दिली हे खरे आहे काय?

**(११)** २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय त्यावेळी पुढच्याच महिन्यात रद्द झाला होता ही गोष्ट लक्षात घेता १९.०९.१९९१ ते २३.१०.९९२ या काळात नेमलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांचा पहिला गट व २३.१०.१९९२ ते **३ एप्रिल २००० या काळात नेमलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांचा दुसरा गट यांच्या विधिमय स्थितीमध्ये कोणताच फरक राहत नाही हे खरे आहे काय?**

**(१२)** उपरोक्त पैकी पहिल्या गटाला नेमणूकीच्या तारखेपासून सर्व लाभ गेल्या दोनचार महिन्यात अदा करण्यात आले. मात्र दुसऱ्या गटाला अशा लाभापासून वंचित ठेवण्यात आले. असा भेदभाव करण्याचे कारण काय?

**(१३)** सन १९९१ ते २००० या काळात सेवेत आलेल्या शेकडो बिगर नेट-सेट अध्यापकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व लाभ (पदोन्नतीसह) अनेक वर्षांपासून प्रदान करण्यात आले असून त्यात रिकव्हरी काढण्याचे राज्य शासनाचे प्रयत्न निरनिराळ्या सहा न्याय निर्णयांनी [(1) W.P. No.1893 of 2010 (2) W.P. No. 1991 of 2011 (3) W.P. No. 5271 of 2013 (4) W.P. No. 4994 of 2013 (5) W.P. No. 6659 of 2013 (6) W.P. No. 5224 of 2013] रद्दबादल ठरविले हे खरे आहे काय?

**(१४)** एकदा विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तता प्रदान केली की त्या शिक्षकांच्या सेवा नियमित समजल्या जातील असा स्पष्ट निर्णय (AIR 1995 SUPREME COURT 336) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १९९४ च्या निर्णयात (परिच्छेद २४) नमुद आहे, हे खरे आहे काय?

**(१५)** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम असेल असे उच्चशिक्षण सचिव, मुख्यसचिव, राज्याचे मा. उच्चशिक्षण मंत्री व मा. मुख्यमंत्री यांनी वेगवेगळ्या तारखांना लिखित स्वरूपात मान्य केले होते. हे खरे आहे काय?

**(१६)** "विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तता प्रदान केली असली तरी "ती कोणत्या तारखेपासून लागू करावी" हे त्यांनी आम्हाला कळविले नाही "तसे त्यांनी कळविले तर त्या तारखेपासून Career Advancement Scheme चे लाभ देण्यास शासन तयार आहे." असे शपथपत्र मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये, दिनांक २९ मार्च २०११ रोजी या प्रकरणामध्ये शासनातर्फे सादर करण्यात आले होते हे खरे आहे काय?

**(१७)** राज्यशासनाने दाखल केलेले शपथपत्र विचारात घेवून दिनांक २० एप्रिल २०११ रोजी ४९०९/२०१० या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने "**प्रदान करण्यात आलेली नेट-सेट मुक्तता कोणत्या तारखेपासून लागू होईल हे विद्यापीठ अनुदान आयोगाने तीन आठवड्यात कळवावे**" असे आदेश पारित केले होते हे खरे आहे काय?

**(१८)** मा. उच्च न्यायालयाचे २० एप्रिल २०११ रोजीचे व मा. सर्वोच्च न्यायालयाचे १९९४ चे आदेश लक्षात घेवून "सन १९९१ते २००० या काळात महाराष्ट्रामध्ये सेवेत भरती झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांना प्रदान करण्यात आलेली नेट-सेट मुक्तता नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनासाठी लागू राहील" असे आदेश २६ ऑगस्ट २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने पारित केले आहेत हे खरे का ? २६ ऑगस्ट २०११ रोजी आयोगाने तसे आदेश पारित केलेले आहेत ही गोष्ट मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी ५७७१४/२०१३ या प्रकरणात दिलेल्या निर्णयात नमूद केलेली आहे हेही खरे आहे काय?

**(१९)** "१९.०९.१९९१ ते ३ एप्रिल २००० या काळात सेवेत भरती झालेल्या सर्व बिगर नेट-सेट अध्यापकांच्या सेवांना नेट-सेट मुक्तता प्रदान करणारा शासननिर्णय १५ दिवसात निर्गमित करण्यात येईल" असे राज्य शासनाच्या वतीने दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर (L/1326/2012) मान्य करण्यात आले होते हे खरे आहे काय?

**(२०)** एवढ्या साऱ्या खटाटोपानंतर औरंगाबादच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी या शिक्षकांची सेवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र आल्याच्या तारखेपासून धरण्याचा निर्णय त्यांच्याच स्तरावर घेतला असून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील Career Advancement Scheme या शब्दावर आपलाच अर्थ लादला. वस्तुतः Career Advancement Scheme या शब्दाचा अर्थ ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १२ ते १६ नुसार निश्चित केलेला आहे हे खरे आहे काय?

**(२१)** शरदेंदु भुषण विरूद्ध नागपूर विद्यापीठ या प्रकरणात (AIR 1988 SUPREME COURT 335) "Experience is the basis of placement" असा एक धोरणात्मक निर्णय मा.सर्वोच न्यायालयाने दिलेला आहे हे खरे आहे काय? तसे करतांना सेवा अखंडित असावी किंवा एकाच विद्यापीठातील असावी असा आग्रह धरणे चुकीचे आहे असेही या निर्णयात नमुद आहे हे खरे आहे काय?

**(२२)** दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १२ अन्वये वेतननिश्चितीचे अधिकार हे विद्यापीठांना प्रदान करण्यात आलेले आहेत. मा. राज्यपालांच्या संमतीने करण्यात आलेल्या परिनियमान्वये या प्रत्येक शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या दिवसापासून धरून वेतननिश्चितीचे लाभ विद्यापीठांनी निश्चित केले हे खरे आहे काय? विद्यापीठाच्या या निर्णयामध्ये बदल करण्याचे अधिकार सहसंचालकांना कोणत्या कायद्याने प्राप्त होतात?

*****

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH, NAGPUR.

WRIT PETITION NO.3885 OF 2014

Dr.Rajesh Panjabrao Ingole and another **VERSUS** The State of Maharashtra and others

Mr.A.I.Sheikh, counsel for the petitioners.
Mr.S.M.Ghodeswar, AGP for the respondent Nos.1 and 2.
Mr.B.G.Kulkarni, counsel for the respondent No.3.

CORAM :
SMT. VASANTI A. NAIK &C. V. BHADANG, JJ.
**DATE: 16.12.2014.**

Heard.
The learned counsel for the parties state that the issue involved in this case was also involved in several writ petitions that were decided by the Aurangabad Bench of the Bombay High Court by the judgment dated 21/11/2013.It is stated that in the bunch of writ petitions bearing Writ Petition No.10283 of 2012 (Sudamrao Keshawrao Aher and others v. The State of Maharashtra and others)and others, the Aurangabad Bench had directed the respondents to re-fix the salary of the petitioners therein so as to bring it at par with the higher salary of the juniors.
It was held by the Aurangabad Bench in the said judgment that the teachers could not have been discriminated only because the junior teacher had acquired Ph.D. Degree after the coming into force of the Sixth Pay Commission Recommendations.
The learned counsel for the respondents agree that similar relief needs to be granted in favour of the petitioners herein.
Hence, for the reasons recorded in the judgment dated 21/11/2013 in Writ Petition No. 10283 of 2013 and others, this writ petition is also allowed. The respondents are directed to compute the amount payable to the petitioners in accordance with the judgment dated 21/11/2013 and release the difference in salary to the petitioners within a period of three months.Order accordingly. No costs.

JUDGE JUDGE

** AF : P 07 **

# संस्थानिक समजून कार्यरत असलेल्या सहसंचालक, उच्च शिक्षण पूणे, यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला ठराव क्रमांक - २

**(१)** भ्रष्टाचाराची चटक लागलेल्या काही उच्च शिक्षण विभागातील मध्यम दर्जाच्या मंत्रालयीन अधिकाऱ्यांच्या चिथावणीने प्रत्येक सहसंचालक हे स्वतंत्र संस्थानाचे संस्थानिक असल्याचा थाटात वागू लागले आहेत. थेट विद्यापीठांना आदेश देणारे जे एक परिपत्रक (जा.क्र.ससं/उशि/पुवि/प्राध्यापकांचे सामूहीक रजा आंदोलन/२०१४/५६५३) दिनांक ६ डिसेंबर २०१४ रोजी **सहसंचालक पुणे विभाग यांनी अतितातडीचे म्हणून त्यांच्याच स्तरावर काढले, तो औध्दत्यपूर्ण व्यवहाराचा एक उत्तम नमुना असून त्याचा तीव्र निषेध करण्यात येत आहे.** अशा प्रकारे विद्यापीठाला आदेश देण्याचे त्यांना अधिकार नसतांना उध्दटपणाचा हा जो व्यवहार त्यांनी केला त्याबाबत चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

**(२)** मंत्रालयातील काही मध्यम पदावरील अधिकारी जूनेच असल्यामूळे उच्च शिक्षण विभागातून भ्रष्टाचारपूरक वातावरण पुढे चालू ठेवण्याच्या कारवाया सुरुच ठेवण्याचा ते प्रयत्न करीत असतात. या प्रयत्नाचे एक उदाहरण म्हणून पुणे उच्च शिक्षण सहसंचालक यांनी काढलेले उपरोक्त परिपत्रक नमूद करता येईल. 'पुक्टो' च्या पदाधिकाऱ्याशी झालेल्या खटाखटीच्या चर्चेनंतर त्यांनी त्याच दिवशी ते पत्रक वेबसाईट वरुन मागे घेतले हा भाग वेगळा. मंत्रालयातील मध्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या तोंडी चिथावणी वरुन सहसंचालकांनी ते पत्रक त्यांच्या स्तरावर काढले होते. ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. आपण आपल्या पातळीवरील संस्थानिक आहोत. आपल्याला आपल्या पातळीवर कोणताही निर्णय घेता येतो. ही मध्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या चिथावणी वरुन गेली अनेक महिने तयार झालेली मनोवृत्ती संपुष्टात येणे ही तातडीची गरज झालेली आहे. अशी चिथावणी व तशी मनोवृत्ती स्पष्ट करणारी अनेक उदाहरणे उपलब्ध आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे :-

**(अ)** एखाद्याची निसर्ग न्यायानुसार बाजू ऐकून घेण्याचे भान न ठेवता अस्तित्विय वित्तलब्धीची कापाकापी करण्याचे म्हणजेच 'रिकव्हऱ्या' काढण्याचे काम सहसंचालकांच्या कार्यालयात बेदरकारपणे सुरु असते. ते उपरोक्त मनोवृत्तीमुळेच होय. त्यामुळे डझनावारी प्रकरणे मा. उच्च न्यायालयापूढे गेली आहेत. अनेक प्रकरणात सहसंचालकांचे आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्द ठरविले, अनेक प्रकरणात त्यांना व्यक्तीशः रकमेचा भरणा ठोठावण्यात आला. अनेक प्रकरणी १२ टक्के व्याजासह रक्कम परत करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले. सतत होत असलेल्या या बेबंदशाही कारभारामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत असून सहसंचालकांच्या स्तरावरील हा मनमानी कारभार एकूणच तिरस्काराचा विषय झाला आहे. या स्थितीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने "सहसंचालक या नात्याने आपणच घेतलेले निर्णय एकदा घेतल्यानंतर आपले आपणच आपल्या पातळीवर सकाळ-संध्याकाळ बदलण्याचे सहसंचालक कार्यालयाचे अधिकार हे न्याय तत्वाच्या विरोधी आहेत" याच्या स्पष्ट सूचना सहसंचालकांच्या कार्यालयाला देण्यात याव्यात अशी विनंती आहे.

**(ब)** सहसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयात त्याच कार्यालयातील बाबू किंवा पूढे नव्याने आलेले नंतरचे सहसंचालक किंवा मुळात ज्यांनी निर्णय घेतला होता तेच सहसंचालक पुन्हा पुन्हा आपल्या मूळ निर्णयात बदल करण्याचा अधिकार वापरतात यातुन भ्रष्टाचाराचे मोठे कुरण तयार होते. सर्व कागदपत्रे सहसंचालकांनी मा. संचालकांकडे पाठवावीत. मा. संचालकांनी याबाबत अंतिम निर्णय घ्यावा. म्हणजे जे काय निर्णय होतील ते राज्यभर सारखे होतील. प्रत्येक 'सहसंचालकांच्या राज्यात' वेगवेगळे निर्णय होण्याच्या आजच्या प्रकाराला त्यामुळे आळा बसेल.

**(क)** शेकडो निवड समित्यांवर शासकीय महाविद्यालयातील तज्ञ व सेवाजेष्ठ शिक्षकांना पाठविण्याचे सोडून एकटे सहसंचालक स्वतःच संचालकांचे नॉमिनी म्हणून प्रत्येक ठिकाणी जातात ही बाब मंत्रालयातील मध्यम दर्जाचे अधिकारी व हे सहसंचालक यांच्यातील 'गुळपीठ' स्पष्ट करण्यास पूरेशी आहे.

सहसंचालकांनी सर्व महाविद्यालयातील सर्व विषयांच्या सर्व निवडसमित्यावर सदस्य म्हणून जाण्याची पद्धती भ्रष्टाचाराला वाव देणारी व अत्यंत टाकावू अशी पद्धत होती. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या सुचनेवरुन दिनांक २४ मार्च २००५ रोजी शिक्षण संचालकांनी एक परिपत्रक काढून "शिक्षकांच्या निवड समितीवर सहसंचालकांनी सदस्य म्हणून जावू नये" असे स्पष्ट आदेश काढले होते व त्याऐवजी "उच्च शिक्षण संचालकांचा प्रतिनिधी म्हणून शासकीय महाविद्यालयातील त्या त्या विषयाच्या ज्येष्ठ प्राध्यापकाची नेमणूक करण्याची पद्धती" सुरु केली होती. परंतु **एकटा सहसंचालक सर्व समित्यांवर असल्यामुळे भ्रष्टाचाराचे कुरण मोकळे व्हावे म्हणून मध्यम दर्जाच्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी ती पद्धती पुन्हा बंद करुन जुनीच भ्रष्ट पद्धती पुन्हा सुरु केलेली आहे. ती ताबडतोब बंद होणे आवश्यक आहे.**

**(ड)** सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ करण्याच्या प्रकाराने तर भ्रष्टाचाराचे फार मोठे कुरण तयार केलेले आहे. त्यामुळे हे वय एकदा निश्चित करावे व त्यामध्ये बदल करण्याचा लहरी कारभार तातडीने बंद करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

**(प्रा. ए. टी. सानप)**
*अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)**
*सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2015-17 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.01.2015**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,............................................................

..................................................................

..................................................................

..................................................................